अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१९-२०
“२२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (अनिवार्य) (२२१५ १८४३)”
मागणी क्रमांक वाय -२

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१९/प्र.क्र.५७/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख : १६ एप्रिल, २०१९

वाचा :-

शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल,२०१९

प्रस्तावना :-

सन २०१९-२० चा अंतरिम अर्थसंकल्प विधानमंडळास सादर करण्यात आला असून विनियोजन विधेयक मंजूर होईपर्यन्तच्या कालावधीसाठीचा माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१९ मंजूर केले आहे. सदर विधेयकाचे अधिनियमात रुपांतर झाले असून ते महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२ म्हणून महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक ८ मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांचा निधी वित्त विभागाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये वितरीत केला आहे.

२. जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन व वेतनेतर खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-२ “२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)” या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष सन २०१९-२० करिता ०१, वेतन साठी रुपये ४३,१७,३२,०००/- व ११, देशांतर्गत प्रवास खर्चासाठी

रुपये १,२३,३८,०००/- अशी एकूण रुपये ४४,४०,७०,०००/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस कोटी चाळीस लाख सत्तर हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

३. आता वित्त विभागाने उपरोक्त परिपत्रकान्वये सन २०१९-२० करीता सदर तरतूदीपैकी रुपये १२,२७,१५,०००/- इतका वेतन निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करुन दिला आहे. सन २०१८-१९ मध्ये संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत केलेला निधी विचारात घेऊन माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांकरीता वेतन निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णयः-

सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (अनिवार्य) (२२१५ १८४३)" या लेखाशिर्षाखाली जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन खर्च भागविण्यासाठी या शासन निर्णयासोबतच्या "विवरणपत्र अ" मध्ये दर्शविल्यानुसार एकूण अनुदान रुपये ११,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एकरा कोटी पन्नास लाख फक्त) संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना मंजूर करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहील. या शासन निर्णयासोबतच्या "विवरणपत्र अ" मध्ये दर्शविण्यात आलेल्या रकमांपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन निर्णयान्वये तसेच यापूर्वी वितरित केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केल्याची खात्री करुनच पुढील आवश्यक निधीची मागणी करण्याची दक्षता घेण्यात यावी. पुढील मागणीपत्र प्राप्त झाल्याशिवाय निधी वितरीत केला जाणार नाही याची संबंधित जिल्हा परिषदांनी नोंद घ्यावी. शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS

द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व Offline पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

४. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (अनिवार्य) (२२१५१८४३)" ०१, वेतन या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ अन्वये विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहेत. या परिपत्रकान्वये नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१६१०३९१६२५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.04.16 13:52:28 +05'30'

चेतन निकम
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विधानसभा / विधान परिषद, सर्व
२. विभागीय आयुक्त,
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे

६. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सर्व
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, वांद्रे, मुंबई
१६. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थ-१९)
१७. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (कार्यासन-१४११)
१८. कार्यासन पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१९. ग्राम विकास व जलसंधारण विभाग
२०. निवड नस्ती कार्यासन पापु-२३

विवरणपत्र-अ

शासन निर्णय क्रमांक बजेट-१४१९/प्र.क्र.५७/पापु-२३, दिनांक १६ एप्रिल, २०१९ सोबतचे सहपत्र

मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५१८४३)"			
अ. क्र.	जिल्ह्याचे नांव	सन २०१९-२० करीता या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेले वेतन अनुदान	या शासन निर्णयान्वये लेखाशीर्ष २२१५ १८४३ खाली वितरीत करण्यात येत असलेली एकूण रक्कम (अक्षरी रुपये)
१	२	३	४
१	ठाणे	३००००००	रूपये तीस लाख फक्त
२	पालघर	२२०००००	रूपये बावीस लाख फक्त
३	रायगड	३२०००००	रूपये बत्तीस लाख फक्त
४	रत्नागिरी	३२०००००	रूपये बत्तीस लाख फक्त
५	सिंधुदुर्ग	२००००००	रूपये वीस लाख फक्त
६	नाशिक	३००००००	रूपये तीस लाख फक्त
७	धुळे	२५०००००	रूपये पंचवीस लाख फक्त
८	नंदुरबार	२७०००००	रूपये सत्तावीस लाख फक्त
९	जळगांव	३५०००००	रूपये पस्तीस लाख फक्त
१०	अहमदनगर	२५०००००	रूपये पंचवीस लाख फक्त
११	पुणे	५५०००००	रूपये पंचावन्न लाख फक्त
१२	सातारा	५२०००००	रूपये बावन्न लाख फक्त
१३	सांगली	३२०००००	रूपये बत्तीस लाख फक्त
१४	सोलापूर	५००००००	रूपये पन्नास लाख फक्त
१५	कोल्हापूर	५००००००	रूपये पन्नास लाख फक्त
१६	औरंगाबाद	४२०००००	रूपये बेचाळीस लाख फक्त
१७	जालना	४२०००००	रूपये बेचाळीस लाख फक्त
१८	परभणी	२००००००	रूपये वीस लाख फक्त
१९	हिंगोली	१५०००००	रूपये पंधरा लाख फक्त
२०	बीड	१७०००००	रूपये सतरा लाख फक्त
२१	नांदेड	३७०००००	रूपये सदतीस लाख फक्त
२२	उस्मानाबाद	३००००००	रूपये तीस लाख फक्त
२३	लातूर	५२०००००	रूपये बावन्न लाख फक्त
२४	बुलढाणा	३२०००००	रूपये बत्तीस लाख फक्त
२५	अकोला	२५०००००	रूपये पंचवीस लाख फक्त
२६	वाशिम	३२०००००	रूपये बत्तीस लाख फक्त
२७	अमरावती	४००००००	रूपये चाळीस लाख फक्त
२८	यवतमाळ	४००००००	रूपये चाळीस लाख फक्त
२९	वर्धा	३२०००००	रूपये बत्तीस लाख फक्त
३०	नागपूर	५२०००००	रूपये बावन्न लाख फक्त
३१	भंडारा	३५०००००	रूपये पस्तीस लाख फक्त
३२	गोंदिया	२५०००००	रूपये पंचवीस लाख फक्त
३३	चंद्रपूर	३५०००००	रूपये पस्तीस लाख फक्त
३४	गडचिरोली	३००००००	रूपये तीस लाख फक्त
एकूण		११५००००००	रूपये अकरा कोटी पन्नास लाख फक्त

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.04.16 13:53:35 +05'30'

(चेतन निकम)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन